रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

## सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती नवीन व नुतनीकरण अर्ज २०२६-२७

## बी.कॉम. / एम.कॉम. / बी.बी.ए. (सी.ए.)

**अंतीम मुदत -३०/०९/२०२६** **दि.२४/०८/२०२६**

फेब्रुवारी २०२६ मध्ये इयत्ता १२ वीत उत्तीर्ण झालेल्या तसेच सिनिअर महाविद्यालयात प्रथम वर्ष वर्गात प्रवेश घेतलेल्या पात्र सर्व विद्यार्थ्यांना नवीन सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरता येईल. महाविद्यालयाच्या वेबसाईटवर फेब्रुवारी २०२६ मध्ये इ. १२ वी उत्तीर्ण झालेल्या पात्र विद्यार्थ्यांची यादी आणि शासन परिपत्रक अपलोड केलेले आहे. तसेच मागील वर्षी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती मिळणाऱ्या विद्यार्थ्यांनी परिपत्रक वाचून किमान ५० टक्के गुणांसह सर्व विषयात उत्तीर्ण असणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनीच अर्ज नुतनीकरण करावा. **तसेच शासन परिपत्रकानुसार ATKT रिजल्ट असणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज नुतनीकरण करता येणार नाही.** विद्यार्थ्यांना नवीन अर्ज भरण्यासाठी व नुतनीकरण करण्यासाठी **अंतीम मुदत दि. ३०/०९/२०२६** अशी आहे. विद्यार्थ्यांनी शासनाने दिलेल्या अंतीम दिनांकाच्या आत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरुन सर्व कागदपत्र जोडून महाविद्यालयात जमा करावा. **मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही यांची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**तसेच SC/OBC/SBC/VJNT/ST/OEPN/Handicap कॅटेगिरीतील विद्यार्थ्यांना सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती किंवा त्यांनी प्रवेश घेतलेल्या कॅटेगिरीचा शिष्यवृत्ती अर्ज या दोन पैकी एकच शिष्यवृत्ती अर्ज भरता येईल. दोन शिष्यवृत्ती अर्ज भरता येणार नाही याची सदर अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.** सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची पेईंग फी प्रमाणे फी भरावी लागेल याची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**अर्ज ऑनलाईन भरताना फक्त ओरिजनलच कागदपत्र अपलोड करावे झेरॉक्स अपलोड करु नये. शिष्यवृत्ती अर्जास खालील कागदपत्रांची झेरॉक्स प्रत दिलेल्या नंबरनुसार सेल्फ अटेस्टेड करुन जोडावीत.**

अर्ज नुतनीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सोबतचे शासनाचे परिपत्रक वाचून पात्र असल्यासच अर्ज नुतनीकरण करावा किंवा काही शंका असल्यास शिष्यवृत्ती विभागातून माहिती घ्यावी. **तसेच विनाअनुदानित (Non-Grant) तुकडीत प्रवेश असलेल्या विद्यार्थ्यांनी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरु नये.**

**विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे अर्जाबरोबर कागदपत्रे सेल्फ अटेस्टेड करुन जोडून द्यावयाची आहे.**

१. ऑनलाईन भरलेला अर्ज.
२. ओरिजनल बोनाफाईड (कॉलेजमधून घेणे.)
३. शाळा सोडल्याचा दाखला व महाविद्यालयाचा दाखला झेरॉक्स.
४. डोमासाईल सर्टिफिकेट झेरॉक्स.
५. रेशन कार्ड झेरॉक्स.
६. आधार कार्ड झेरॉक्स
७. आधार कार्ड लिंक फॉर्म झेरॉक्स.
८. सन २०२६-२७ मधील प्रवेश पावती झेरॉक्स.
९. वडीलांचा वार्षिक उत्पन्नाचा सन २०२५-२६ चा दाखला. उत्पन्न ४.५० लाख रु.च्या आत. **(ओरिजनल उत्पन्न दाखला तहसिलदार यांचेकडील )** वडील हयात नसल्यास आईच्या नावाचा उत्पन्न दाखला जोडून वडीलांचा मृत्यु दाखला जोडावा तसेच आई-वडील विभक्त राहत असल्यास त्या संबंधी कागदपत्र जोडावे. )
१०. नुतनीकरण अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी एफ.वाय.बी.कॉम. च्या अर्जाला जोडलेला उत्पन्नाचा दाखला झेरॉक्स जोडावी.
११. दहावी व त्या पुढील सर्व गुणपत्रक
१२. जातीचा दाखला (कॅटेगिरीतील विद्यार्थ्यांसाठी )
१३. बँक पासबुक

Chandraroop Dakale Jain College of Commerce • Shrirampur

प्राचार्य,
चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर

www.cdjcollege.com

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर वेखील टाकण्यात आलेली आहे.